# मंत्रिमंडळ निर्णय

७ मे २०१४

( मंत्रिमंडळ बैठक क्र.१६१)

| क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | मुंबईच्या शासकीय विधी महाविद्यालयातील शिक्षकांची पदे लोकसेवा आयोगाच्या कक्षेतून वगळणार | उच्च व तंत्रशिक्षण |
| २ | गौण वनोपजाची मालकी आता ग्रामसभांकडे देखील हस्तांतरित | वने |
| ३ | सात सहकारी साखर कारखान्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी वाढीव शासकीय भागभांडवल देण्याचा निर्णय | सहकार |
| ४ | भेलच्या सर्वाधिक गुंतवणुकीच्या देशातील पहिल्या सोलर सेल्स प्रकल्पाला राज्याचे प्रोत्साहन | उद्योग |

## मुंबईच्या शासकीय विधी महाविद्यालयातील शिक्षकांची पदे लोकसेवा आयोगाच्या कक्षेतून वगळणार

मुंबई येथील शासकीय विधी महाविद्यालयातील शिक्षकांची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतून वगळण्याचा निर्णय आज राज्य मंत्रिमंडळाने घेतला.

सध्या ही पदे आयोगाकडून भरण्यात येतात. मात्र, नियामक परिषदेचा ठराव आणि रिक्त पदांची संख्या विचारात घेऊन हा निर्णय घेण्यात आला. हे शासनाचे मुंबईतील एकमेव विधी महाविद्यालय असून या महाविद्यालयास वैभवशाली इतिहास आहे. येथून पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना विधी व न्यायिक क्षेत्रात विशेष महत्त्व आहे. गेल्या काही काळात महाविद्यालयातील शिक्षकांची बरीच पदे रिक्त होती. अपुऱ्या मनुष्यबळा अभावी कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना अतिरिक्त कार्यभार किंवा तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त्या करून शिक्षकांची कमतरता दूर करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. तथापि, यामुळे महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा वाढण्यास खीळ बसत असल्याचे निदर्शनास आले आहे.

या महाविद्यालयास स्वायत्तता मिळविण्यासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांना या निर्णयामुळे चालना मिळेल.

-----०-----



## गौण वनोपजाची मालकी आता ग्रामसभांकडे देखील हस्तांतरित

अनुसूचित क्षेत्रातील गौण वनोपजाची मालकी ग्रामसभांकडे देखील हस्तांतरित करण्याचा निर्णय आज राज्य मंत्रिमंडळाने घेतला.

त्यानुसार महाराष्ट्र अनुसूचित क्षेत्रातील गौण वनोपज मालकीचे हस्तांतरण व महाराष्ट्र वनोपज व्यापाराचे विनियमन या अधिनियमात आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील. अनुसूचित क्षेत्रामधील गौण वनोपजाची मालकी ग्रामपंचायतींबरोबरच ग्रामसभांकडे देखील हस्तांतरित होणे आवश्यक होते, त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला.

-----०-----

## सात सहकारी साखर कारखान्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी वाढीव शासकीय भागभांडवल देण्याचा निर्णय

राज्यातील उभारणी सुरु असलेल्या सात सहकारी साखर कारखान्यांना ३७६५.४५ लाख एवढे शासकीय भागभांडवल देण्याचा निर्णय आज राज्य मंत्रिमंडळाने घेतला. या कारखान्यांवरील वाढ जाणारा आर्थिक भार पाहता हा निर्णय घेण्यात आला.

ज्या कारखान्यांना हे वाढीव भागभांडवल देण्यात येणार आहे ते पुढील प्रमाणे आहेत :-

संत कुर्मदास, सोलापूर; भाऊसाहेब बिराजदार,उस्मानाबाद; बाणगंगा,उस्मानाबाद; शरद,औरंगाबाद; टोकाई,हिंगोली; छत्रपती,बीड; शिवशक्ती,उस्मानाबाद;

हे कारखाने १२५० मे.ट. गाळप क्षमतेचे असून सुधारित प्रकल्प किंमत ४५ कोटी रुपये किंवा प्रकल्प उभारणीसाठी आलेल्या प्रत्यक्ष खर्चापैकी शासकीय धोरणानुसार १:५ या प्रमाणे जी रक्कम कमी होईल तेवढे भागभांडवल देण्यात येईल. २७ ऑक्टोबर २०१० पूर्वी उभारणी झालेल्या १२५० टीसीडी क्षमतेच्या व पाईप लाईन संवर्गातील ज्या कारखान्यांच्या उभारणीला अजून सुरुवात झालेली नाही त्यांना हे वाढीव भागभांडवल देण्यात येणार नाही.

-----०-----



## भेलच्या सर्वाधिक गुंतवणुकीच्या देशातील पहिल्या सोलर सेल्स प्रकल्पाला राज्याचे प्रोत्साहन

भारत हेवी इलेक्ट्रीकल्सची (भेल) देशातील सर्वात मोठी गुंतवणूक असलेल्या सोलर सेल्स प्रकल्पाला प्रोत्साहन देण्यासाठी अति विशाल प्रकल्पाचा दर्जा व अतिरिक्त प्रोत्साहने देण्याचा निर्णय आज राज्य मंत्रिमंडळाने घेतला. या कंपनीत सोलर पीव्ही सेल्स (२४० मे.वॅ.) आणि सोलर पीव्ही म्योड्युल्स (१०० मे.वॅ.) चे उत्पादन होणार आहे.

भंडारा जिल्ह्यातील साकोली येथे २७३१ कोटी रुपयांची गुंतवणूक असलेला आणि ३००० व्यक्तींना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार देणारा हा प्रकल्प असून कंपनीने राज्य शासनाकडे प्रोत्साहन देण्याची मागणी केली होती. प्रकल्पामुळे विदर्भात नवीन लघु उद्योगांची मोठ्या प्रमाणावर निर्मिती होऊन रोजगाराच्या विपुल संधी प्राप्त होतील. प्रकल्प विदर्भातील मागास भागात स्थापन होणार असून या प्रकल्पामुळे विदर्भाच्या सर्वंकष औद्योगिक, आर्थिक व सामाजिक विकासास चालना मिळेल. सदरचा प्रकल्प हा विदर्भातील केंद्र शासनाचा पहिलाच प्रकल्प आहे. त्याचप्रमाणे प्रकल्प सोलर पी व्ही सेल्स् व सोलर पी व्ही मोड्यूल्स् या सोलार फोटोव्होल्टाईक उत्पादनाचा असून प्रकल्पास केंद्र शासनाच्या National Clean Energy Fund (NCEF) अंतर्गत अर्थसहाय्य (Subsidy) मिळणार आहे.

या प्रकल्पामुळे हरीत ऊर्जेच्या निर्मितीस व वापरास चालना मिळणार असल्याने सदर प्रकल्प हा राष्ट्रीयदृष्टया पथदर्शक व महत्त्वाचा प्रकल्प आहे. मे. भेल यांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सुमारे ४८० एकर जमीन संपादित करून दिलेली आहे. या ठिकाणी मे. भेल यांनी रू. ५०० कोटीचा फॅब्रीकेशन प्रकल्प प्रस्तावित केलेला असून प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. या फॅब्रीकेशन प्रकल्पास सुद्धा राज्य शासनाने विशाल प्रकल्पाचा दर्जा व प्रोत्साहने मंजूर केली आहेत. मे. भेल यांचेकडे या ठिकाणी जमीन उपलब्ध असल्याने प्रस्तावित प्रकल्पाचे काम लवकरच सुरू करता येईल.

-----०----